ललिता गंडभीर
4200 N. Ocean Dr.

1501-2

Riviera Beach

FL 33404

U.S.A

# 'न्युक्लिअर बॉम्ब फायलीत टाकलाय'

एकदा मारुआ नावाचा एक शहाणा, विद्वान व प्रजेच्या हिताची काळजी घेणारा एक राजा घुंगरूतलैया या लहानशा देशात राज्य करत होता.

मारुआच्या देशाजवळच एक कजाबू नावाचा प्रचंड देश होता. त्या देशाचा राजा कजाबू याची घुंगरूतलैया या लहानशा पण समृद्ध देशावर नजर होती. त्या देशाला गिळंकृत करण्याचा त्याचा विचार होता. मारुआच्या हे कानावर आले होते. म्हणून त्याने आपल्या देशात शक्तिशाली बलवान लष्कर निर्माण करायचा प्रयत्न केला होता. मारुआच्या प्रयत्नात त्याला यशही आले होते. परंतु लष्कराचा पगार, शस्त्रे, सैनिकांची घरे इत्यादींची व्यवस्था ठेवायला त्याला एक यंत्रणा निर्माण करावी लागली होती. त्या यंत्रणेची नोकरशाही माजोरी झाली होती. ह्या नोकरशाहीच्या कार्यक्षमतेवर मारुआचा विश्वास नव्हता. या नोकरशाहीला कार्यक्षम करण्याचे त्याचे सर्व प्रयत्न व्यर्थ ठरले होते. नोकरशाहीमुळे आपले लष्कर राष्ट्राचे संरक्षण करण्यास अयशस्वी ठरेल, अशी त्याला सतत भीती वाटत होती.

राष्ट्राचे संरक्षण करायला त्याला दुसरा उपाय हवा होता. बराच विचार केल्यावर त्याला उपाय सुचला -

न्युकरिका या राष्ट्राकडून न्युक्लिअर बॉम्ब ऑर्डर करायचा.

कजाबूचे लष्कर प्रचंड होते. पण त्याच्याकडे न्युक्लिअर बॉम्ब नव्हता. घुंगरूतलैयाकडे तो असता तर त्या एका बॉम्बच्या विध्वंसक शक्तीमुळेच कजाबूला घुंगरुतलैयावर स्वारी करण्याची हिंमत झाली नसती.

म्हणून न्युकरिका या सुपर पॉवर राष्ट्राच्या प्रेसिडेंटला पत्र लिहून मारुआने न्युक्लिअर बॉम्ब मागवला.

न्युकरिकाच्या प्रेसिडेंटला घुंगरुतलैया नावाचे राष्ट्र या जगाच्या पाठीवर आहे, याचा सुद्धा पत्ता नव्हता. प्रथम त्याला वाटले, त्याची कुणीतरी थट्टा करत आहे. तो ते पत्र फाडून टाकण्याच्या विचारात होता. पण मग त्याने ठरविले, "हो! न्युक्लिअर बॉम्बची ऑर्डर आहे. पत्र फाडण्यापूर्वी असे राष्ट्र अस्तित्वात आहे का, ह्याची चौकशी करायला हवी; त्यासाठी सेंट्रल मिसइनफॉर्म्ड एजन्सीच्या संपर्क अधिकाऱ्यास बोलावून घ्यावे."

प्रेसिडेंटच्या बोलावण्यानुसार सी.एम्.ए.चा संपर्काधिकारी ताबडतोब उपस्थित झाला. प्रेसिडेंटने त्याला पत्र दाखवताच त्या पत्रावर त्याने ताबडतोब टॉप सिक्रेटचा शिक्का मारून टाकला.

प्रेसिडेंट म्हणाला, "प्रथम या नावाचे राष्ट्र अस्तित्वात आहे का, याची चौकशी कर. ही थट्टाही असेल!"

संपर्काधिकारी म्हणाला, "आमच्याकडे येणाऱ्या प्रत्येक पत्रावर आम्ही 'टॉप सिक्रेट' असा शिक्का मारतो. अगदी साबणाची जाहिरात असली, तरी."

प्रेसिडेंट म्हणाला, "असे राष्ट्र अस्तित्वात आहे का?"

संपर्काधिकारी उत्तरला, "चौकशी करून सांगतो."

तो दुपारी परत आला व म्हणाला, "खरोखर असे एक छोटे राष्ट्र आहे. तेथे राजेशाही आहे."

प्रेसिडेंट म्हणाला, "मग त्यांना न्युक्लिअर बॉम्ब का हवा आहे, याची गुप्त चौकशी करा."

"करतो." असे म्हणून संपर्काधिकारी सी.एम.ए. त परत गेला. सी.एम.ए.च्या प्रमुखाला त्याने ते पत्र दाखवले.

प्रमुखाने ताबडतोब विमानातून पॅराशूटने, पाणबुडीतून, आगगाडी व बसने गुप्तहेर घुंगरूतलैयाला पाठवले. गुप्तहेरांनी अनेक ठिकाणी चौकशी केली. त्यांना पुढील धर्तीची उत्तरे मिळाली.

"आम्हाला कशाला हवाय न्युक्लिअर बॉम्ब?"

"रावसाहेब, हे खेळ न्युकरिकासारख्या श्रीमंत देशाचे, आमचे नाहीत."

"आमचं पोट भरलं की पुष्कळ झालं. बॉम्बची पीडा हवी कशाला?"

"आमचा राजा शहाणा आहे. तो असल्या बॉम्बच्या भानगडीत पडणार नाही."

शेवटी एका गुप्तहेराने लष्करी नोकरशाहीच्या इमारतीत जायचे ठरविले.

प्रथम तो इमारतीभोवती असलेल्या पाण्याच्या कालव्यामधून, मग पाण्याखालून गेला. तिथून त्याला गुप्त भुयारी वाट सापडली. त्या वाटेने तो जमिनीखालच्या भुयारी वाटांच्या चक्रव्युहात शिरला. ते फोडून तो आवारातल्या चक्रव्युहात आला. ते चक्रव्यूह पार केल्यावर त्याला काही जागे, काही अर्धवट झोपेत तर काही दारू प्यालेले पहारेकरी आडवे आले. त्या सर्वांना ठार मारून तो नोकरशाहीच्या इमारतीत शिरला.

सगळ्या डेस्कवर कागदांचे, फायलींचे ढीग होते. टेलिप्रिंटर्स चालू वा बंद होत होते. टेलिफोन्स वाजून थांबत होते. पण भर दिवसा तिथे एकही माणूस नव्हता. 'सारी माणसे एखाद्या रोगाच्या साथीत मेली की काय!' अशी शंका त्या हेराला चाटून गेली. तो गुप्तहेर या ऑफिसातून त्या ऑफिसात हिंडत राहिला.

शेवटी एका प्रचंड ऑफिसात तो शिरला. त्या लांबट ऑफिसात एक मोठ्ठे कॉन्फरन्स टेबल मांडलेले होते. भोवती लेदर खुर्च्या होत्या. जमिनीवर अलिशान कार्पेट होते. भिंतीवर महागडी पेंटिंग्ज होती. हे कुणा उच्चवर्गीय व्यक्तीचे ऑफिस असावे अशी गुप्तहेराची खात्री झाली.

तेव्हढ्यात महाआश्चर्य घडले. कोपऱ्यात आरामखुर्चीत त्याला एक झोपलेला माणूस दिसला.

गुप्तहेराने त्याच्यावर बंदूक रोखली व तो म्हणाला, "ए ऊठ बघू!"

तो माणूस डोळे चोळत उठून बसला व आश्चर्याने विचारू लागला, "कोण आहेस तू? परदेशी दिसतोयस. तू इथे का आणि कशासाठी आला आहेस? काय हवंय तुला?"

हेर म्हणाला, "प्रथम तू कोण आहेस ते सांग."

तो माणूस म्हणाला, "मी लष्करी नोकरशाहीच्या सर्व खात्यांचा प्रमुख!"

त्याच्याकडे संशयित नजरेने पाहत गुप्तहेराने विचारले, "इथला नोकरवर्ग कुठाय?"

तो माणूस उत्तरला, "काही लोक आजारी आहेत. काही सुट्टीवर आहेत, काहींनी लीव्ह ऑफ अबसेन्स घेतलीय, काही परदेशात सबॅटिकलवर गेले आहेत, काही बायका न्यूकरिकेत त्यांच्या मुली-सुनांची बाळंतपणे करण्यासाठी गेल्या आहेत, काहींची मुले आजारी आहेत म्हणून त्या आलेल्या नाहीत. इत्यादी इत्यादी. मी पण येणार नव्हतो. पण बायकोशी भांडण झाले. ती शांतपणे झोपू देत नाही, म्हणून इथे येऊन झोपलो."

गुप्तहेराने सांगितले, "मी न्युकरिकाचा गुप्तहेर आहे. तुमच्या राजाने न्युक्लिअर बॉम्ब मागवलाय. तो कशासाठी हे विचारायला आलो आहे. तू एवढ्या महत्त्वाच्या हुद्यावर आहेस तर बॉम्ब का मागवलाय ते सांग."

तो प्रमुख म्हणाला, "तुला समजेल अशा भाषेत सांगतो - आय डोंट नो अँड आय डोंट केअर. त्याने का बॉम्ब मागवलाय ते त्यालाच माहीत. आता तू जा बघू. उगीच मला त्रास देऊ नकोस."

गुप्तहेर म्हणाला, "तू लष्करी नोकरशाहीचा प्रमुख आहेस आणि तुला तुमच्या राजाला न्युक्लिअर बॉम्ब का हवा आहे ते माहीत नाही यावर मी कसा विश्वास ठेवू!"

नोकरशाहीचा प्रमुख म्हणाला, "राजे आणि राजकीय पुढारी यांना पॉवरगेम्स खेळायला आवडते. न्युक्लिअर बॉम्ब त्यांना पॉवर ट्रिपसारखा वाटतो. त्यांच्या ह्या पोरकट खेळाकडे मी दुर्लक्ष करतो."

"तुम्हाला बॉम्ब डिलिव्हर करता येतो का?"

विचार करत प्रमुख म्हणाला, आम्हाला फक्त छोटी बाळे डिलिव्हर करण्याचे ज्ञान आहे."

गुप्तहेर म्हणाला, "बॉम्ब टाकायला विमान लागते."

प्रमुख : "आमच्याकडे प्रवासी ने-आण करणारी विमाने आहेत. त्या विमानाने बॉम्ब टाकता येतो का?"

गुप्तहेर : "तुम्हाला बॉम्ब टाकायचे ज्ञान नाही. तुझ्याशी बोलून मला अद्यापि तुमच्या राजाला बॉम्ब का हवाय याचे आकलन झालेले नाही."

प्रमुख : "सांगतोय ते ऐक. राजांना पॉवरगेम्स खेळायला आवडतात. मी तुला सोपा उपाय सांगतो. तुम्ही आमच्या राजाला बॉम्ब पाठवा. तो त्याला कधी मिळणार नाही."

गुप्तहेर : "तुझ्या पत्त्यावर पाठवून देऊ का बॉम्ब?"

नोकरशाही प्रमुख : "नको. नोकरशाहीच्या पत्त्यावर पाठवा."

सी.एम.ए.ने प्रेसिडेंटला 'डमी बॉम्ब पोस्टाने पाठवावा' अशी सूचना केली.

त्याप्रमाणे बॉम्ब पाठवला. प्रेसिडेंटने मारुआला पत्र पाठवले.

मारुआ महाराजा यांस स. न.

आपण मागवल्याप्रमाणे आपल्या लष्करी नोकरशाहीच्या पत्त्यावर रजिस्टर पोस्टाने न्युक्लिअर बॉम्ब पाठवला आहे. मित्रराष्ट्र म्हणून आम्ही आपल्याला बिल पाठवत नाही.

कळावे,

आपला नम्र

न्युकरिकाचा प्रेसिडेंट

मारुआने ते पत्र वाचून कपाळाला हात लावला.

ताबडतोब त्याने आपल्या असिस्टंट, डेप्युटी व्हाइस व चीफ मिनिस्टरना क्रमाक्रमाने तो बॉम्ब आणण्यासाठी पाठवले. ते सगळे रिक्त हस्ते परतले.

शेवटी मारुआ स्वतःच गेला. लष्कराचा प्रमुख म्हणाला, "हो, बॉम्ब मिळाला. तो ऑफिसमधल्या फायलीत टाकलाय. तो मिळाला की लगेच फोन करतो."

मारुआ म्हणाला, "मूर्खांनो, तुम्ही बॉम्ब हरवलाय."

प्रमुख थंडपणे म्हणाला, "आम्ही वा इतर काहीही कधीच हरवत नाही. बॉम्ब फाईल केलेला आहे. आम्ही सगळं शिस्तीत ठेवतो."

मारूआ वीस वर्षे बॉम्ब शोधतोय. पूर्वीचा प्रमुख आता स्वर्गात पोचून तीन वर्षे उलटतील. बॉम्ब सापडत नाहीये. अजूनही नोकरशाही बॉम्ब हरवला असे कबूल करत नाही. 'फाईल केलाय' असेच म्हणते आहे.

'न्युकरिकाने घुंगरुतलैयाला बॉम्ब पाठवला' ह्या बातमीने घाबरून कजाबूने घुंगरूतलैयावर स्वारी मात्र केली नाही.